प्राधिकरण व विभागीय मंडळाच्या
अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या बदल्या
करण्याबाबत धोरण ठरविण्याबाबत.

परिपत्रक

---

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१
क्र.प्राधि/बदली/धोरण/२०११/४१९४ /प्र.८, दिनांक : 27 OCT 2011

---

प्राधिकरण व विभागीय मंडळातील अधिकारी/कर्मचारी यांच्या बदल्याबाबतचे धोरण ठरविण्याची बाब प्राधिकरणाच्या विचाराधीन होती. शासनाच्या बदली अधिनियमातील तरतूदीनुसार प्राधिकरणाच्या व विभागीय मंडळाच्या बदल्यांबाबत प्राधिकरण स्तरावर खालीप्रमाणे बदल्यांचे धोरण ठरविण्यात येत आहे.

२/- शासनाने दिनांक १२/५/२००६ रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्रान्वये शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्या विनियमन करण्यासाठी आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध करण्यासाठी तरतूद करण्यासाठी महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांचे बदल्यांचे विनियम आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ प्रसिध्द करण्यांत आला आहे. सदर अधिनियम दि.१/७/२००६ पासून लागू होत असल्याने शासकीय अधिकारी आणि कर्मचारी यांच्या बदल्या करतांना या अधिनियमांतील तरतूदींचे काटेकोरपणे पालन केले जाईल यांची त्यांनी दक्षता घ्यावी. शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्या संदर्भात सदर अधिनियम अस्तित्वात येण्यापूर्वी निर्गमित केलेले सर्व आदेश दि.१ जुलै २००६ पासून अधिक्रमित झाले असे समजण्यात यावे असे सामान्य प्रशासन विभागाने दि.७/६/२००६ रोजीच्या परिपत्रकान्वये कळविले आहे. सदर अधिनियमातील प्रकरण दोन मधील ३ [१] नुसार अ, ब आणि क गटातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्याकरिता एखाद्या पदावर असण्याचा सामान्य कालावधी तीन वर्षाचा असेल परंतु असा कर्मचारी हा गट क मधील बिगर-सेक्रेटरिएट सेवेतील कर्मचारी असेल तर अशा कर्मचाऱ्याने धारण केलेल्या पदावर दोन पूर्ण पदावधींची सेवा पूर्ण केल्यानंतर त्यांची त्या कार्यालयातून किंवा विभागातून दुसऱ्या कार्यालयात किंवा विभागात बदली करण्यांत येईल, अशी तरतूद सदर अधिनियमामध्ये करण्यांत आली आहे.

३/- अधिकारी/कर्मचारी यांच्या बदल्या बाबतच्या अधिनियम २००५ व सुधारणा २००७ नुसार गट ब, क व ड मधील सर्व कर्मचाऱ्यांच्या बदलीचे अधिकार मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा. यांना प्राप्त झालेले आहेत. तसेच गट " अ " मधील अधिकाऱ्यांच्या बदलीबाबत शासनाने दिनांक ८/८/२००८ रोजीच्या पत्रान्वये बदली प्रस्तावावर बदली अधिनियम २००५ व प्रचलित नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी. असे कळविले आहे. त्या अनुषंगाने, गट " अ " मधील अधिकाऱ्यांच्या बदलीचे अधिकार मा.उपाध्यक्ष/प्रा. यांना प्राप्त झालेले आहेत. अशा प्रकारे प्राधिकरण व विभागीय मंडळातील वर्ग-१,२ व ३ मधील अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या बदलीचे अधिकार मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा. यांना प्रदान झालेले आहेत.

४/- उक्त अधिनियम २००५ मधील परिच्छेद ६ मध्ये असे नमूद करण्यांत आले आहे की, विभागीय किंवा जिल्हा स्तरावर काम करीत असलेला विभाग प्रमुख अशा अधिकाऱ्यांची विभागांतर्गत बदली करण्यास सक्षम असेल आणि जिल्हा प्रमुख अशा अधिकाऱ्यांची जिल्हयांतर्गत बदली करण्यास सक्षम असेल. तसेच तक्त्यांत विनिर्दिष्ट केलेल्या बदली करणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याला सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे या कलमाखालील त्यांचे अधिकार त्यांच्या कोणत्याही दुय्यम प्राधिकाऱ्याकडे सोपविता येतील.

वरील तरतूदींच्या अनुषंगाने, संबधित विभागीय मंडळाचे मुख्य अधिकारी यांना, त्यांच्या मंडळांतर्गत वर्ग-२,वर्ग-३ व वर्ग-४ या कर्मचाऱ्यांच्या विभाग/मंडळ/जिल्ह्यांतर्गत बदल्या करण्याचे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत. तसेच, वर्ग-४ मधील कर्मचाऱ्यांच्या मंडळाबाहेर किंवा विभागाबाहेर बदलीचे अधिकार सचिव/प्राधिकरण यांना प्रदान करण्यात येत आहेत.

५/- प्राधिकरण विभाग व विभागीय मंडळातील अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या विनंती/आंपआपसात बदल्यांबाबतच्या प्रकरणे खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून हाताळण्यात यावीत.

i) अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या विनंती/आपआपसात बदल्या करतांना, प्रशासकीय हिताचा प्राधान्याने विचार करण्यात यावा, परंतू यासाठी किमान कार्यकाल पूर्ण करणे आवश्यक राहील.

ii) आपआपसात व इतर विनंती बदल्यांबाबत सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्र.एसआरव्ही/२०१०/प्र.क्र.२१०/१०/१२, दि.३/६/२०११ नुसार किमान ३ वर्षे सेवा पूर्ण झाली असल्यास अपवादात्मक परिस्थितीत बदल्यांबाबत निर्णय घेण्यात येईल.

iii) अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या विनंतीवरुन बदल्या करतांना, ' त्यांचे स्वतःचे, पत्नी, मुले यांचे आजारपण ' या कारणामुळे आजारपणाचे स्वरुप लक्षात घेऊन करावी. तथापि, मुलांचे शिक्षण, आंई वडीलांचे आजारपण इत्यादी तत्सम कारणास्तव बदली करण्यात येवू नये.

iv) पती-पत्नी एकत्रिकरण धोरणाच्या अनुषंगाने, त्यांची बदली करावयाची झाल्यास सेवावधी पूर्ण झालेला असावा. तसेच, पती-पत्नी एकत्रिकरण धोरणामुळे त्यांना एकाच ठिकाणी दिर्घ कालावधीपर्यंत ठेवू नये.विहित कालावधीनंतर ते बदलीस पात्र राहतील.

६/- अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या बदल्या बाबतचे अधिनियम २००५ व सुधारणा २००७ नुसार अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या बदल्या खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून करण्यात याव्यात.

i) वर्ग-१ मधील अधिकाऱ्यांच्या बदल्या एकाच पदावर ३ वर्षे पूर्ण झाल्यानंतर प्राधिकरणांतर्गत असलेल्या कोणत्याही विभागीय मंडळामध्ये करण्यात याव्यात.

ii) वर्ग-२ मधील अधिकाऱ्यांच्या बदल्या मंडळा अंतर्गत एका जिल्ह्यामध्ये किंवा एका विभाग / मंडळामध्ये अथवा मंडळाबाहेर (महाराष्ट्रात) ३ वर्षाचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर करण्यात येतील.

iii) प्रशासकीय अधिकारी / मिळकत व्यवस्थापक / भूव्यवस्थापक / लेखाधिकारी / सहाय्यक लेखाधिकारी / लेखापाल तसेच सहाय्यक ही पदे व्यवस्थापनाचे दृष्टीने अत्यंत महत्वाची व संवेदनशील असल्याने त्यापदांवर ३ वर्षे विहित कालावधी पूर्ण झाल्यावर इतर मंडळात (महाराष्ट्रात) कोठेही बदली करण्यात येईल.

iv) वर्ग-३ मधील कर्मचाऱ्यांच्या बदल्या मंडळा अंतर्गत एका जिल्ह्यामध्ये किंवा एका विभागामध्ये सर्वसाधारणपणे ३ वर्षे व मंडळामध्ये ६ वर्षाचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर करण्यात याव्यात.

v) वर्ग-४ मधील कर्मचाऱ्यांच्या बदल्या विनंतीनुसार तसेच प्रशासकीय कारणास्तव करण्यात याव्यात.

vi) वरील वर्ग-१ ते ४ संवर्गातील बदल्या प्रशासकीय कारणास्तव व तक्रारीच्या अनुषंगाने बदली कालावधी पूर्ण न होता देखील करण्यात येतील.

७/- मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळामध्ये नेमणूक मिळण्याबाबत, काही अधिकारी/कर्मचारी प्रयत्नशील असतात. याकरिता बाहेरील राजकीय/अराजकीय लोकप्रतिनिधींमार्फत प्रशासनावर दबाव आणला जातो. याबाबी लक्षात घेऊन मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळातील नेमणूकीचा पदावधी खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

i) मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळात अधिकारी/कर्मचाऱ्यांचा कालावधी हा जास्तीत जास्त ३ वर्षे इतका राहील.

ii) सदरहू अधिकारी/कर्मचाऱ्यांना विहित कालावधी पूर्ण झाल्यानंतर आगामी ६ वर्षे पून्हा मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळामध्ये बदलीने नेमणूक करता येणार नाही.

iii) मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळात काम केलेल्या वर्ग-१ व वर्ग-२ मधील अधिकाऱ्यांची मुंबई बाहेरील मंडळांमध्ये बदली करण्यात येईल.

८/- शासन बदली अधिनियम २००५ मधील नियम ४ व नियम ५ मधील तरतूदींमध्ये नमूद केलेल्या कालावधीत प्राधिकरण व विभागीय मंडळातील अधिकारी /कर्मचारी यांच्या बदल्या करण्यात याव्यात.

९/- प्राधिकरण व विभागीय मंडळातील अधिकारी /कर्मचारी यांच्या विनंत्या व तक्रारींच्या अनुषंगाने, बदल्या करणेसाठी खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

अ) सचिव/प्राधिकरण

ब) उपमुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण

क) वित्त नियंत्रक / प्राधिकरण

ड) मुख्य अभियंता-३/प्राधिकरण

वरीलप्रमाणे गठित केलेल्या समितीच्या शिफारशीच्या अनुषंगाने विनंती व तक्रारींबाबतच्या प्रकरणी निर्णय घेऊन, बदल्या करण्यात याव्यात.

१०/- प्राधिकरण व विभागीय मंडळातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना इतर कार्यालयांच्या मागणीनुसार खाली नमूद असलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून प्रतिनियुक्तीने नेमणूक देण्यात यावी.

i) अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या प्रतिनियुक्तीचा कालावधी हा प्रथमतः एक वर्षाचा असेल.

ii) म.ना.से.(पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंब बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ मधील नियम ४० मधील तरतूदीनुसार अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सेवेबाबत संबंधित कार्यालयाने केलेल्या शिफारसीच्या अनुषंगाने व प्राधिकरणाचे हित लक्षात घेऊन प्रतिनियुक्तीच्या कालावधीस मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात यावा.

iii) संबंधित कार्यालयाची मागणी आल्यानंतर सदरहू अधिकारी/कर्मचाऱ्याची तांत्रिक आवश्यकता व प्राधिकरणाच्या कामकाजात अडथळा होणार नाही ह्या सर्व बाबी विचारात घेऊन निर्णय घेण्यात यावा.

iv) केवळ अधिकारी/कर्मचाऱ्यांची इच्छा किंवा कार्यालयांची मागणी आणि लोकप्रतिनिधींची शिफारस आहे, हा प्रतिनियुक्तीसाठी निकष मानला जाऊ नये.

११/- तसेच, शासनाच्या परिपत्रकानुसार वर्ग १ ते ४ मधील कोणत्याही कर्मचाऱ्यांनी लोकप्रतिनिधी, राजकीय संघटनांचे कार्यकर्ते आणि अशासकीय व्यक्ती यांच्यामार्फत, त्यांच्या तक्रारीचे निवारण, बदल्या तसेच वैयक्तिक काम करुन घेण्याबाबत प्रतिबंध करण्यात आले आहे. तसेच, महाराष्ट्र नागरी सेवा [वर्तणूक] नियम, १९७९ मधील कलम २३ मधील तरतुदींनुसार शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांनी त्यांच्या सेवे संबंधीच्या कोणत्याही बाबीसंबंधात राजकीय पुढाऱ्याकडून दबाब आणणे ही गैरवर्तणूक आहे. वर्तणूक नियमातील तरतुदींचा भंग केल्यामुळे शासकीय कर्मचारी दोषी ठरला तर त्यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा [शिस्त व अपील] नियम १९७९ मधील तरतुदींनुसार शिस्तभंग विषयक कारवाईस पात्र ठरतो. याबाबतच्या सूचना वेळोवेळी सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांना देण्यात आलेल्या आहेत. या सूचनांचे पालन करावे.

यास्तव संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांच्या तक्रारीचे निवारण, बदल्या तसेच वैयक्तिक काम करुन घेण्यासाठी संबंधित विभागामार्फत विनंती करावी. अशा प्रकारे प्राप्त झालेल्या विनंती अर्जावर गुणवत्तेनुसार योग्य तो निर्णय घेण्यात यावा.

१२/- प्राधिकरण विभाग व प्रादेशिक मंडळामध्ये कार्यरत असलेल्या वर्ग-१ ते वर्ग-४ मधील सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय हित व कामाची निकड लक्षात घेऊन करावयाच्या प्रसंगानुरुप बदल्यांचे सर्व अधिकार मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा. यांना राहतील.

सदरहु परिपत्रक सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्या निदर्शनास आणण्यात यावे.

(सतिश म. गवई)
उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
प्राधिकरण

<u>प्रत सस्नेह अग्रेषित :</u>

१. मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी / प्रा.
२. मुख्य अभियंता / प्रा. (१/२/३)
३. वित्त नियंत्रक / प्रा.
४. विधी सल्लागार / प्रा.
५. उपमुख्य कार्यकारी अधिकारी / प्रा.
६. मुख्य वास्तुशास्त्रज्ञ व नियोजनकार/ प्रा.
७. चौकशी अधिकारी / प्रा.

सक्षम प्राधिकारी (१) (२) / प्रा.

मुख्य जनसंपर्क अधिकारी / प्रा.

१०. मुख्य अधिकारी / मुं.गृ.नि. व क्षे.वि.मं./ मुं.इ.दु.व पु.मं./ मुं.झो.सु.मं.
कोंकण / पुणे / नाशिक / नागपूर / औरंगाबाद / अमरावती मंडळ

११. सहमुख्य अधिकारी / मुंबई मंडळ / मुं.इ.दु.व पु.मं.

१२. उपमुख्य अभियंता, (ना.व सं.तं. कक्ष )/प्रा./ द.व गु.नि./प्रा./ जेएनएनयुआरएम/प्रा./
नियोजन / एस.आर.डी./ स्थापत्य / मुं.मं./ परिमंडळ-१, २, ३, ४ / दु.व पु.मंडळ

१३. वास्तुशास्त्रज्ञ व रचनाकार /मुं.मं.

१४. कार्यकारी अभियंता, (विद्युत)/( दुरुस्ती)/(वांद्रे)/(घाटकोपर )/(एस.आर.डी.-१, २, ३,४)/
(प्रनिस)/ अतिक्रमण निर्मुलन कक्ष/मुंबई मंडळ

१५. कार्यकारी अभियंता १, २, ३ / प्रा. / विद्युत / प्रा.

१६. कार्यकारी अभियंता (पूर्व) (पश्चिम) (शहर)/मुं.झो.सु.मंडळ

१७. संचालक पणन कक्ष / मुंबई मंडळ.

१८. मुख्य लेखाधिकारी / मुं.गृ.व क्षे.वि.मं./ मुं.इ.दु.पु.मं./ मुं.झो.सु.मं.

१९. उपनिबंधक सहकारी संस्था / मुं.मं.

२०. उपमुख्य अधिकारी (मि.व्य. १/२) डब्ल्यू / मुंबई मंडळ./ पु.गा./सं.गा./मुं.इ.दु.व पु.मंडळ

२१. मिळकत व्यवस्थापक (१) (२) (३) (४) (५)/ मुं.मं./ (पु.गा.),(सं.शि.)/ दुवपुमं.

२२. लेखाधिकारी/प्रा. डब्ल्यु./मुं.मं.

२३. सहाय्यक लेखाधिकारी (उत्तर) (दक्षिण) (मध्य)/ मुं.इ.दु.व पु.मंडळ

२४. मुख्य लेखा अधिकारी / कोंकण / पुणे /नाशिक /औरंगाबाद / नागपूर / अमरावती मंडळ

२५. निवासी लेखापरीक्षा अधिकारी/प्रा.

२६. संचालक/पी.डी.सी. पुणे.

२७. कार्यकारी अभियंता / ए, बी-१,बी-२, सी-१, सी-२, सी-३, डी-१, डी-२,डी-३, ई-१,
ई-२, फ/ग दक्षिण, फ (उत्तर), ग (उत्तर), मुं.इ.दु.व पु.मंडळ

२८. सहव्यवस्थापकीय संचालक / शि.पु.प्र.लि.

प्रत, प्रशासकीय अधिकारी/प्रा./ मुं.मं./ दुवपुमं./ मुं.झो.सु.मं.

प्रत माहितीसाठी :-

मा. उपाध्यक्ष/प्रा. यांचे स्वीय सहाय्यक

प्रत, अध्यक्ष, महाराष्ट्र गृहनिर्माण कर्मचारी संघटना

प्रत, प्रधान कार्यवाह, मागासवर्गीय कर्मचारी संघटना

प्रत, अध्यक्ष, ग्रॅज्युएट इंजिनिअर्स असोसिएशन ऑफ म्हाडा, मुंबई.

प्रत, अध्यक्ष, सर्वश्री.महाडीक, बैकर, केदारे, लाड, सहाय्यक

प्रत :- सर्वश्री.महाडीक, बैकर, केदारे, लाड, सहाय्यक
श्रीम.राणे, श्रीम.शिंदे, श्रीम.एस.एस.पाटील, श्रीम.पाटील, श्रीम.माने, सहाय्यक
श्री.गायकवाड, व.लि., श्रीमती.खिसमतराव,व.लि., श्री.माळी, व.लि.
श्रीमती चौधरी, देयक लिपिक / प्रा.

प्रत लेखापाल / प्रा., श्रीमती लाडी, व.ले.प., श्रीमती चौधरी, देयक लिपिक / प्रा.